**ठळक बातम्या**

- जगातल्या प्रत्येक क्षेत्रात विकासासाठी तंत्रज्ञानाची आवश्यकता असून तंत्रज्ञान विश्वव्यापी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरण-२०२४ ला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता, लोहगाव विमानतळाचं नामांतर जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे, असं करण्याचा निर्णय

- जम्मू काश्मीर विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या निवडणुकीच्या प्रचाराची सांगता

- २०२५ मधे ऑस्करच्या शर्यतीत भारताचं प्रतिनिधित्व “लापता लेडीज” करणार

- लेबननमध्ये इस्रायलनं केलेल्या हल्ल्यांमध्ये १८२ जण ठार, ७२७ जखमी

**आणि**

- शेअर बाजारात तेजी कायम /सेन्सेक्सची ८५ हजाराकडे, तर निफ्टीची २६ हजाराकडे घोडदौड

**<><><><><>**

जगातल्या प्रत्येक क्षेत्रात विकासासाठी तंत्रज्ञानाची आवश्यकता असून तंत्रज्ञान विश्वव्यापी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं

आहे. अमेरिका दौऱ्यात न्यूयार्कमध्ये अमेरिकेतल्या तंत्रज्ञान क्षेत्रामधल्या आघाडीच्या कंपन्यांच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकांची गोलमेज परिषद प्रधानमंत्री मोदी यांनी घेतली. तिथं ते बोलत होते.

न्यूयॉर्कमधे लाँग आयलंड इथं भारतीय समुदायातर्फे आयोजित कार्यक्रमालाही त्यांनी संबोधित केलं. अमेरिकेतला भारतीय समुदाय म्हणजे भारताचे सदिच्छा दूत असल्याचं ते यावेळी म्हणाले. बोस्टन आणि लॉसएंजलिस इथं दोन भारतीय दूतावास सुरू केले जातील, अशी घोषणा प्रधानमंत्र्यांनी या वेळी केली.

मोदी यांनी आज न्यूयॉर्कमध्ये कुवेतचे राजपुत्र शेख सबाह अल-खालिद अल-सबाह यांच्याशी तसंच नेपाळचे प्रधानमंत्री के. पी. शर्मा ओली यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. सीईओ राऊंडटेबल या कार्यक्रमात त्यांनी उद्योजकांशी चर्चा केली.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरण-२०२४ ला आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्राला एक सशक्त सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळख निर्माण करुन देणं, आपल्या समृद्ध वारसा आणि कलेची जपणूक करुन जागतिक पातळीवर राज्याचं सांस्कृतिक महत्व अधोरेखित करणं, या दृष्टीनं हे सांस्कृतिक धोरण तयार केलं आहे.

पुण्याच्या लोहगाव विमानतळाचं नाव बदलून जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे, असं करण्याचा निर्णय आजच्या

बैठकीत झाला. राज्यातल्या १४ आयटीआय संस्थांचं नामकरण करण्याचा निर्णयही यावेळी झाला.

कुणबी समाजातल्या “तिलोरी कुणबी”, “तिल्लोरी कुणबी”, “ति.कुणबी” या पोटजातींचा राज्य शासनाच्या “इतर मागासवर्ग” यादीत समावेश, दूध अनुदान योजनेत उत्पादकांना गायीच्या दुधाकरता लीटरमागे ७ रुपयांचं अनुदान, पणन हंगाम २०२३-२४साठी भात गिरणीधारकांना प्रती क्विंटल चाळीस रुपये अतिरिक्त भरडाई दर, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या नवीन ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाला मंजुरी, ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी पदांचं एकत्रीकरण, जीएसटी अधिनियमात सुधारणा, ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ, राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ, जलसंपदा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी, इत्यादी निर्णय या बैठकीत झाले.

**<><><><><>**

राज्यभरात राष्ट्रीय पोषण माह राबवला जात आहे. राज्यातल्या नागरी, ग्रामीण आणि आदिवासी भागात एक लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्रांद्वारे यासंबंधी जनजागृती आणि अंमलबजावणी सुरू आहे. याची माहिती देण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त कैलास पगारे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले.

**होल्ड - कैलास पगारे (२४ सेकंद)**

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत केंद्रीय चित्रपट प्रमाणीकरण मंडळ आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा घेतला,. तत्पूर्वी आज सकाळी जे. पी. मॉर्गन भारतीय गुंतवणूकदार परिषदेत ते सहभागी झाले होते.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नव्या इमारतीचं भूमिपूजन सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या हस्ते आज झालं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. आर. गवई, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्यायमूर्ती उज्जल भुयान, न्यायमूर्ती अभय ओक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि इतर यावेळी उपस्थित होते.

भारताची लोकशाही बळकट करण्यात न्यायव्यवस्थेची भूमिका महत्त्वाची असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलं. न्यायव्यवस्था हे लोकांचं आशास्थान आहे. आरोपीला तत्काळ शासन व्हावं अशी नागरिकांची अपेक्षा आहे आणि त्यासाठी सक्षम न्यायव्यवस्था उभी करण्याचे प्रयत्न आपण सर्वांनी करायला हवेत. यात शासन कुठंही कमी पडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

निवडणूक आयोगाचं पथक २६ ते २८ सप्टेंबर या दरम्यान महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहे. या काळात राज्यातले विविध राजकीय पक्ष, राज्य निवडणूक आयोग, सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यासोबत

आयोगाचं पथक बैठक घेणार आहे. २८ सप्टेंबरला मुंबईत आयोगाची वार्ताहर परिषद होईल. यात राज्यातल्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीर विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या निवडणुकीच्या प्रचाराची आज सांगता झाली.

जम्मू काश्मीरमध्ये २५ सप्टेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यातलं मतदान होणार आहे. यात २५ लाखांहून अधिक मतदार २३९ उमेदवारांचं भवितव्य ठरवणार आहेत. जम्मू काश्मीरमधल्या सहा जिल्ह्यातल्या २६ विधानसभा मतदारसंघात या टप्प्यात मतदान होणार आहे.

दरम्यान, सर्व राजकीय पक्षांनी तिसऱ्या टप्प्यासाठीही प्रचाराचा जोर वाढवला आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पूंछ आणि श्रीनगरमध्ये प्रचारसभांना संबोधित केलं. नॅशनल कॉन्फरन्स - काँग्रेस पक्षाच्या युतीचे उमेदवार शहानवाज चौधरी आणि जम्मू-काश्मीर प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष तारिक हमीद कारा यांच्या समर्थनार्थ त्यांनी आज निवडणूक रॅली काढली.

<><><><><>

पुढच्या वर्षी म्हणजेच २०२५ मधे होणाऱ्या अकादमी पुरस्कार सोहळ्यासाठी भारताकडून लापता लेडीज हा चित्रपट पाठवला जाणार आहे.

किरण राव दिग्दर्शित हा चित्रपट बेस्ट फॉरेन फिल्म विभागात भारताचं प्रतिनिधित्व करेल, असं भारतीय चित्रपट महासंघानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

लेबननमध्ये आज सकाळपासून इस्त्रायलनं केलेल्या हल्ल्यांमध्ये किमान १८२ जण ठार झाले असून ७२७ जण जखमी झाले आहेत. यात बालकं, महिला, आणि आरोग्यसेवकांचा समावेश असल्याचं लेबननच्या आरोग्यमंत्र्यांनी सांगितलं. लेबननमधल्या ३०० ठिकाणांवर हल्ले केल्याची माहिती इस्त्रायली सैन्यानं दिली आहे.

दुसऱ्या बाजूला, हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेनं इस्त्रायलच्या उत्तर भागातल्या लष्करी तळांवर आणि रसद गोदामांवर क्षेपणास्त्र डागली आहेत. इस्त्रायलनं केलेल्या हवाई हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हा हल्ला केल्याचं हिजबुल्लाहनं म्हटलं आहे. दरम्यान, लेबननच्या मेका खोऱ्यात हल्ला करण्यासाठी आपली विमानं सज्ज होत असल्याचं इस्त्रायलच्या लष्करी प्रवकत्यानं सांगितलं.

इस्त्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातला तणाव वाढत असून स्थिती दिवसोंदिवस बिघडत चालली आहे, ही अत्यंत चितेंची बाब असल्याच रशियानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

शेअर बाजारामधल्या व्यवहारांमध्ये दिवसभरात तेजी दिसून आली. सकाळच्या सत्रातच शेअर बाजारानं आतापर्यंतचा सार्वकालिक उच्चांक गाठला होता. दुपारच्या सत्रातही तेजी कायम राहिली. बाजार बंद होताना मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ३८४ अंकांची वाढ नोंदवत ८४ हजार ९८० अंकांच्या नवा उंचीवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही१४८ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ९३९ अंकांच्या विक्रमी उंचीवर बंद झाला.

**<><><><><>**

संपूर्ण जगाचं नेतृत्व करण्यासाठी सक्षम करण्याची जबाबदारी देशाच्या युवाशक्तीवर आहे, असं प्रतिपादन पर्यावरण, वनं आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी केलं आहे. मुंबईतल्या नरसी मोनजी शिक्षण संस्थेत विकसित भारतासाठी युवाशक्ती या कार्यक्रमाचा प्रारंभ आज त्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी यादव यांनी ‘एक पेड माँ के नाम’ अभियानांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमातही भाग घेतला.

**<><><><><>**

येत्या १० नोव्हेंबरला होणाऱ्या टीईटी, अर्थात महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यासाठी अंतिम मुदत येत्या ३० तारखेपर्यंत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजयकुमार राठोड यांनी ही माहिती दिली.

या परीक्षेशी संबंधित सर्व शासननिर्णय, इतर तपशील राज्य परीक्षा परिषदेच्या mahatet.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

MPSC च्या राजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षेत राज्यशासनाच्या कृषि सेवेतल्या पदांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आज नवी मुंबईत बेलापूर इथं झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. विविध संवर्गांच्या एकूण २७४ रिक्त पदांकरीता महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ ची जाहिरात गेल्या डिसेंबरमधे प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर कृषी विभागतल्या २५८ पदांसाठीची मागणी आयोगाला मिळाली. शासनाच्या विनंतीनुसार या पदांचा समावेश  त्याच परीक्षेत करण्यात आला असून आता येत्या १ डिसेंबरला पूर्व परीक्षा होणार आहे.

**<><><><><>**

यंदा देशभरात११ कोटी ४ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. त्यापैकी ४ कोटी १३ लाख हेक्टरक्षेत्र भाताच्या पिकाखाली असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यंदा कडधान्याच्या क्षेत्रात वाढ झाली असून १ कोटी २८ लाख हेक्टर क्षेत्रावर कडधान्याची लागवड झाली आहे. १ कोटी ९२ लाख हेक्टरवर तृणधान्य, तर १ कोटी ९३ लाख हेक्टरवर गळीत पिकांची पेरणी झाली आहे. ५७ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर ऊसाची लागण झाली आहे.

**<><><><><>**

अमरावती जिल्ह्यात मेळघाटातल्या सेमाडोह परिसरात आज खासगी बस पुलावरून नदीत कोसळून झालेल्या अपघातात ४ जण ठार तर २५ जण जखमी झाले. यापैकी ७ जणांची प्रकृती गंभीर आहे. ही बस अमरावतीहून

धारणीच्या दिशेने प्रवास करत होती. चालकाचं नियंत्रण सुटल्यानं बस पुलावरून नदीत कोसळल्याची माहिती मिळत आहे.

**<><><><><>**

बुलडाणा जिल्ह्यातल्या मोताळा तालुक्यात टिप्पर उलटून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. हे मजूर खामगाव तालुक्यातल्या वाडी इथले रहिवासी होते.

**//<><><><><>//**